## हुरडा पार्टी
**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



## सेवेकरी भरती
१) सुपरवायझर- १ | २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ | ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ | ६) स्वयंपाक बाई-१

याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १७७ वा | शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# 'मराठ्यांचा पाच हजार वर्षांच्या इतिहासात असा विश्वासघात कोणीच केला नसणार' - जरांगे पाटील

**जालना (कटूसत्य वृत्त):-** भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भेट झाली. स्वतः सुरेश धस यांनी या भेटीच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. या भेटीनंतर मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.

सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांची भेट झाल्याच्या वृत्तावर आपला विश्वासच बसत नाही. परंतु हे जर खरे असेल तर मराठ्यांच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासात असा विश्वासघात कोणीच केला नसणार, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. तुम्ही भेटण्यासाठी गेलात. तुम्हाला त्यांच्याबद्दल कोणती एवढी माया सुटली? असा सवाल जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांना केला.

**काय म्हणाले मनोज जरांगे**

माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, सुरेश धस हे धनंजय मुंडे यांना भेटण्यासाठी गेले असतील यावर विश्वास बसत नाही. ज्याने आपली माणसे मारली, त्याला हे भेटायला जात आहेत. मराठ्यांनी तुमच्यावर विश्वास टाकला होता. परंतु त्यांच्या या विश्वासाचा तुम्ही घात केला. या ठिकाणी विश्वासघात शब्दही अपूर्ण आहे. संतोष देशमुख यांची ज्या क्रूरपणे हत्या झाली, त्यासंदभातील आरोपींशी संबंध असणाऱ्या व्यक्तीला भेटायला जाणे म्हणजे समाजाचा विश्वास तुम्ही संपवला आहे. धनंजय मुंडे यांच्या इतकी क्रूर पंकजाताई नाही, असे मनोज जरांगे म्हणाले.

**...तर फडणवीस यांच्यापेक्षा धस जास्त दोषी**

तुम्हाला मराठ्यांनी काय कमी केले, ज्यामुळे तुम्ही असा प्रकार केला. ज्याने संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या केली.



त्यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी जात आहात. त्यामुळे हे प्रकरण त्यांना दबायचा आहे. सर्व आरोपी सोडायचे आहे, असे दिसत असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले. मनोज जरांगे म्हणाले, खून करणाऱ्यापेक्षा खूनाचा कट रचणारा जसा जास्त दोषी असेल, तसेच या प्रकरणात सुरेश धस दोषी असतील. या प्रकरणातील एकही आरोपी सुटला तरी त्याची जबाबदारी सुरेश धस यांची राहणार आहे. जे देवेंद्र फडणवीस यांनी केले नाही ते सुरेश धस यांनी केले. गोड बोलून फसवणूक केली, असे मनोज जरांगे यांनी या भेटीवर प्रतिक्रिया देताना म्हटले. धनंजय मुंडे यांच्यावर शस्त्रक्रिया झाली त्यामुळे भेटल्याचे सुरेश धस म्हणाले. त्यावर बोलताना मनोज जरांगे म्हणाले, ते काय कोमामध्ये होते. तसेच परिवारीक भेट म्हणतात, मग ते काय तुमचे चुलते आहे का? गोड बोलून काटा काढणे, असा हा प्रकार आहे. मराठ्यांच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासात असे कोणीच केले नाही. परंतु लक्षात ठेवा, कोणी आले तरी मी हे प्रकरण दाबू देणार नाही, असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

तुमच्या राजकारणासाठी तुमच्या एखाद्या पदासाठी आणि स्वाथार्साठी तुम्ही इकडे तिकडे हिंडत आहात. इकडे तिकडे हिंडायचे असेल तर यामध्ये यायचे नाही, असेही जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांना ठणकावले. सुरेश धस यांना इकडे समाजाची वाहवा करून घ्यायला पाहिजे. समाजाच्या पाठीवर हात फिरवायला पाहिजे. परंतु त्यांना समाज आणि राजकारण पण करायचे आहे. मला वाटते त्यांनी फक्त कोणतेही एकच करावे. जर सुरेश धस धनंजय मुंडे यांना भेटले असतील तर शंभर टक्के मराठ्यांच्या काळजावर वार केला आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

# मोहोळ ग्रामीण रुग्णालयात एक्स-रे आणि सोनोग्राफी सुविधांचा अभाव

## गरोदर लाडक्या बहिणींच्या जीवाशी खेळ, उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा फक्त कागदावरच

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळाला असला तरी अद्याप मूलभूत वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाहीत. रुग्णालयात अत्यावश्यक एक्स-रे आणि सोनोग्राफी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गरीब गरोदर महिलांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. वेळेवर उपचार न मिळाल्याने महिलांचे आरोग्य धोक्यात येत असून, आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना गंभीर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यामुळे वेळेवर निदान होत नसल्याने अनेक गंभीर आजारांचे निदान उशिरा होण्याची शक्यता वाढली आहे.

**गरोदर महिलांसमोरील धोके आणि आरोग्यविषयक आव्हाने**

मोहोळ ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गरोदर महिलांना वेळेवर आवश्यक तपासणी करणे कठीण झाले आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार गरोदरपणात ठरावीक कालावधीत सोनोग्राफी तपासणी करणे अत्यावश्यक असते, कारण याच तपासणीतून बाळाच्या प्रकृतीविषयी आणि गर्भवती महिलेच्या आरोग्याविषयी अचूक माहिती मिळते. मात्र, ही सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना सोलापूर किंवा इतर खाजगी रुग्णालयात धाव घ्यावी लागते.

**तपासणीतील विलंब आणि त्याचे गंभीर परिणाम**

तपासणी वेळेवर न झाल्यास गर्भाच्या वाढीतील त्रुटी, बाळाला जन्मतः असलेले काही आजार, किंवा गर्भवती महिलेला असलेले आरोग्यविषयक धोके ओळखता येत नाहीत. यामुळे गर्भवती महिलेला प्रसूतीदरम्यान जीवघेण्या अडचणींना सामोरे जावे लागण्याची शक्यता वाढते. अनेक प्रकरणांमध्ये महिलांना रक्तदाब, मधुमेह किंवा गर्भाशयाच्या स्थितीत बिघाड आढळतो, परंतु वेळेवर निदान न झाल्यास यामुळे प्रसूतीच्या वेळी मोठा धोका निर्माण होतो.





**आर्थिक आणि मानसिक त्रास**

सोनोग्राफीसाठी महिलांना सोलापूर किंवा खाजगी रुग्णालयात जावे लागते, ज्यामुळे आर्थिक खर्च वाढतो. एक तपासणी करण्यासाठी किमान 1,000 ते 1,500 रुपये मोजावे लागतात. ग्रामीण भागातील महिलांसाठी हा खर्च परवडणारा नसतो. याशिवाय, वारंवार प्रवासामुळे शारीरिक थकवा होतो आणि मानसिकदृष्ट्याही महिलांवर ताण येतो. अनेक महिलांना वेळेअभावी किंवा प्रवासाच्या अडचणीमुळे तपासणी टाळावी लागते, याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

**स्थानिक नागरिकांचा संताप**

स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना वेळोवेळी या समस्यांवर आवाज उठवत आहेत परंतु प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही या समस्या कायम आहेत. उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा केवळ कागदावर असल्याची भावना आता नागरिकांमध्ये तीव्र झाली आहे.

"रुग्णांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. एक्स-रे आणि सोनोग्राफीसाठी आम्ही सोलापूरला धाव घेतो. गरीबांना हे परवडणारे नाही," सरकार एकीकडे महिलांसाठी *"लाडकी बहिण योजना"* यासारख्या योजना राबवत आहेत व मोहोळ सारख्या तालुक्याच्या ठिकाणी लाडक्या बहिणींचे हाल होत असताना याकडे मात्र सोलापूर प्रशासन अधिकारी लक्ष देत नाहीत ही चिंतेची बाब आहे असे मोहोळ शहराली नागरिकांनी संताप व्यक्त केला.

**नागरिकांची मागणी**

नागरिक आणि सामाजिक संघटनांची मागणी आहे की, मोहोळ ग्रामीण रुग्णालयात तातडीने एक्स-रे आणि सोनोग्राफी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. प्रशासनाने याकडे गंभीरतेने लक्ष देऊन या सुविधा लवकरात लवकर सुरू केल्या पाहिजेत, जेणेकरून सामान्य जनतेला दिलासा मिळेल आणि लाडक्या बहिणींना चांगले आरोग्य लाभेल.

# दुष्काळी पट्ट्याला टेंभू योजनेचा आधार

## २.५ टीएमसी पाणी वितरित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सांगली, सातारा आणि सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांसाठी रब्बी हंगामासाठी टेंभू उपसा सिंचन योजनेचे आवर्तन जानेवारीच्या पहिल्या आठवड्यास सुरू झाले. सव्वा महिन्यात तब्बल अडीच टीएमसी पाणी उचलून दुष्काळी पट्ट्यातील लाभ क्षेत्राला दिले आहे, अशी माहिती टेंभू उपसा सिंचन योजनेच्या सूत्रांनी दिली.

सांगली, सातारा आणि सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांतील लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांनी सिंचन योजना सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार टेंभूचे रब्बीसाठी आवर्तन सुरू केले आहे. या आवर्तनामुळे ५५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सध्या शेतकऱ्यांच्या मागणीनुसार हे आवर्तन सुरू असून जोपर्यंत लाभ क्षेत्राच्या शेवटच्या भागापर्यंत पाणी पोहोचत नाही तोपर्यंत ही हे आवर्तन सुरू राहणार आहे. टेंभूचे सध्या सुरू असलेले आवर्तन हे मुख्य कालव्यातून पुढे जात आहे. टप्पा अ १ आणि टप्पा ब १ या ठिकाणी एकूण ३३ पंप, तर आरफळचे दोन पंप टप्पा क्रमांक दोन २ पंप, तीन अ ९ पंप, टप्पा चार आणि टप्पा पाच अनुक्रमे २ असे एकूण ५५ पंप सुरू आहेत.

सव्वा महिन्यात टेंभू योजनेतून २.६१५ टीएमसी पाणी उचलून दुष्काळी पट्ट्यातील शेतीची तहान भागवली आहे. दरम्यान, या आवर्तनातून लाभ क्षेत्रातील तलाव भरण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान, जानेवारी अखेर सिंचन व बिगर सिंचनापोटी ६ कोटी ११ लाख पाणीपट्टी वसूल झाली आहे. मार्चअखेर पर्यंत १८ कोटी पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट आहे.

**थकित पाणीपट्टी भरावी, अन्यथा, सात-बारावर बोजा**

सिंचन वर्ष २०२३-२४ मधील खरीप, रब्बी, उन्हाळी हंगामामध्ये सोडण्यात आलेल्या पाण्याची पाणीपट्टी कपात ही कारखान्यांमार्फत केली जाते. मात्र, लाभधारक पाणीपट्टी न भरता ते लाभक्षेत्राबाहेरील साखर कारखान्यांना गाळपासाठी ऊस घालवत असल्याने पाणीपट्टी थकित होते. त्यामुळे पाणीपट्टी आकारणी करण्यात येऊन त्यांचे ७/१२ वर महसूल खात्यामार्फत बोजा नोंद चढवण्याची कार्यवाही केली जाणार आहे. लाभक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांनी सर्वच लाभधारकांच्या ऊस क्षेत्राची पाणीपट्टी कपात करावी. तसेच, ज्या लाभधारकांनी कारखान्यांकडे पाणीपट्टी जमा केली आहे, त्यांची व कपात केलेली पाणीपट्टी जमा करावी, असे आवाहन टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभागाने केले आहे.

# वाळू माफियांवर सर्जिकल स्ट्राइक..!

## १३ बोटी नष्ट, २ कोटी ६० लाखांचा फटका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे आणि सोलापूर जिल्ह्यात वाळू माफियांवर जोरदार कारवाई करत प्रशासनाने उजनी पाणलोट क्षेत्रात मोठी धडक दिली. इंदापूर तालुका ते बिटरगाव वांगी या परिसरात वाळू उपसा करणाऱ्या १३ बोटी पकडून बुडवण्यात आल्या, तर ३ सक्शन बोटी जप्त करण्यात आल्या. या कारवाईमुळे वाळू माफियांना तब्बल २ कोटी ६० लाखांचा फटका बसला आहे.

**संयुक्त मोहिमेचा दणका**

सोलापूर जिल्ह्याचे महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे, आणि सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी या मोहिमेत मोलाची भूमिका बजावली.



संबंधित विद्यार्थिनीने वसतिगृह बदलून देण्यासाठी अर्ज केला होता. मोशी येथील वसतिगृह आणि तिचे महाविद्यालय हे अंतर खूप असल्याने तिच्या सोयीसाठी विनंतीनुसार वसतिगृह बदलून देण्यात आले आहे.
– प्रमोद जाधव, सहआयुक्त (शिक्षण), समाजकल्याण आयुक्तालय

**ड्रोनच्या मदतीने 'ऑपरेशन क्लीन अप'**

माळवाडी जॅकवेल ते करमाळा तालुक्यातील बिटरगाव वांगीपर्यंत पाठलाग करत या पथकाने वाळू माफियांच्या बोटी पकडल्या आणि बुडवून नष्ट केल्या. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील ड्रोन सर्वेअर संकेत बाबर यांच्या मदतीने ही कारवाई अधिक प्रभावीपणे पार पाडली गेली.

**वाळू माफियांना इशारा..!**

इंदापूरचे माजी तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्या सहभागामुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. त्यांच्या धडक कारवाईचा अनुभव आणि प्रभाव ओळखून माफियांना प्रशासनाचा कडक इशारा मिळाला आहे.

**वाळू माफियांवरची ही कारवाई फक्त सुरुवात आहे का?**

वाळू माफियांवर झालेल्या या महासर्जिकल स्ट्राइकनंतर पुढील कारवाई काय असेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. प्रशासनाच्या या धडक पावलांमुळे वाळू माफियांचा पुढील डावपेच काय असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**गृहपालांवर कारवाईची मागणी**

पिझ्झा आणि नोटीस प्रकरणाची तातडीने चौकशी करून मोशी येथील वसतिगृहाच्या गृहपालांवर कारवाई करावी, अशी मागणी स्टुडंट हेल्पिंग हॅन्ड्स संस्थेकडून करण्यात आली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी समाज कल्याण विभागाने नियमावली तयार करावी. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन आणि सुरक्षेसाठी विशाखा समिती प्रत्येक वसतिगृहात स्थापन करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# आता काटकसरीची योजना

## राज्य सरकारकडून खर्चात ३० टक्के कपातीचे निर्देश



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणांमुळे चालू आर्थिक वर्षात मार्चअखेर महसुली आणि भांडवली खर्चात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. सरकारी वाहनांच्या इंधनावरील खर्चातही २० टक्के कपात करण्याची वेळ सरकारवर आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा घोषणांमुळे दोन लाख कोटींपेक्षा अधिकची वित्तीय तूट, पुरेशा निधीचा अभाव यामुळे सरकारला आखडता हात घ्यावा लागत आहे.

खर्च वाढला तरी राज्याची आर्थिक परिस्थिती भक्कम असल्याचा निवाळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार हे वारंवार देत होते. पण खचार्साठी पुरेसे पैसेच उपलब्ध नसल्याने भांडवली खर्चात ३० टक्के कपात सरकारला करावी लागली आहे. सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू असताना आवश्यक खचार्साठी निधीची उपलब्धता लक्षात घेता मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ७० टक्के रक्कम खर्च करण्यात यावी, असा आदेश काढण्यात आला आहे.

**इंधन खर्चालाही कात्री**

वाहनांच्या इंधन खर्चात अनेक वर्षांनी कपात करण्यात आली आहे. बक्षीस वितरण, विदेश प्रवास, प्रकाशन, संगणक खर्च, जाहिरात, बांधकामे, कंत्राटी सेवा, सहायक अनुदान, मोटार वाहन यासाठीच्या निधी वितरणाचे प्रस्ताव प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला याची खात्री करूनच १८ फेब्रुवारीच्या आत संबंधित विभागांना वित्त विभागाकडे पाठवावे लागणार आहेत. खर्च न होणारा निधी क्षेत्रीय अधिकारी, मंडळे आणि महामंडळांच्या बँक खात्यात ठेवता येणार नसल्याचे वित्त विभागाने स्पष्ट केले आहे.

**लोकप्रिय घोषणांचा फटका**


विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावण्यात आला होता. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. सुमारे एक लाख कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. यातून वित्तीय तूट दोन लाख कोटींवर गेली आहे. या पार्श्वभूमीवर खर्चात कपात करण्याशिवाय पर्याय नव्हता, असे सांगण्यात आले.


(पान 2 वर..)


# जल जीवन योजना पूर्ण, तरी हस्तांतर रखडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रायगड जिल्ह्यात दरवर्षी जाणवणारी टंचाई जल जीवन योजनांमुळे कमी होईल, अशी आशा ग्रामस्थांची होती. यासाठी जवळपास पंधराशे कोटी रुपये खर्चून १,४९६ जल जीवनच्या योजनांची कामे गतवर्षी हाती घेण्यात आली; मात्र अजूनही पाणीटंचाईचे सावट कायम आहे.

यंदा २७६ गावे आणि ७४० वाड्यांना पाणीटंचाई भासेल, असा अंदाज वर्तवत जिल्हा परिषदेने टंचाईवर तात्पुरत्या स्वरूपात मात करण्यासाठी पाच कोटी ६२ लाख रुपयांचा आराखडा तयार केला आहे. जल जीवन योजनेची कामे सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. कधी जीएसटी घोटाळा, तर कधी एकाच कंत्राटदाराने कमिशन घेऊन दुसऱ्या कंत्राटदाराला विकलेल्या कामांमुळे जल जीवनची कामे नेहमीच चर्चेत राहिली. यात निकृष्ट दजार्ची कामे हा सर्वात कळीचा मुद्दा राहिला. या सर्व योजना डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते; मात्र यातच लाडकी बहीण योजनेने सरकारी तिजोरी रिकामी केल्याने जल जीवनच्या १,४२२ पैकी ७३१



योजनांचे काम पूर्ण होऊनही यातील ४७१ योजनांची देयके देण्यासाठी जिल्हा परिषदेकडे पैसेच शिल्लक राहिले नाहीत.

**२०२४ची डेडलाइन हुकली**

जिल्ह्यातील १,४९६ जल जीवन योजनांसाठी केंद्र सरकारकडून खर्च केले जाणार आहेत. 'हर घर नल से जल'ची घोषणा करीत प्रसिद्धीही देण्यात आली होती. २०२४च्या अखेरपर्यंत योजना पूर्ण होण्याची डेडलाइन देण्यात आली होती. त्यामुळे २०२४ नंतर जिल्ह्यात पाणीटंचाई राहणारच नाही, असे सत्तेतील लोकप्रतिनिधी सांगत होते. प्रत्येकाच्या घरात नळाद्वारे पाणी येणार म्हणून जिल्ह्यातील टंचाईग्रस्त नागरिक खूश होते; मात्र योजनेच्या अंमलबजावणीतील अनेक दोषांमुळे योजना पूर्ण होऊ न शकल्याने महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी यंदाही पायपीट करावीच लागणार आहे.

# नागपूर येथील द्वारकाधीश प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षपदी ॲड. राजन दीक्षित यांची निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व सोनार समाजाचे प्रणेते ॲड. राजन दीक्षित यांची नागपूर येथील द्वारकाधीश प्रतिष्ठांनच्या कार्याध्यक्षपदी अध्यक्ष सौ. अंजलीताई अनासणे यांनी नुकतीच पुणे येथे झालेल्या मिटींगमध्ये निवड केली. नागपूर येथील द्वारकाधीश प्रतिष्ठानद्वारे विविध सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मीक उपक्रम गेली १० वर्षे विनामुल्य राबविली जातात. तसेच या प्रतिष्ठानच्या वतीने



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गेल्या महिन्यात नागपूर येथे भेट घेऊन पंढरपूर येथे सोनार समाजाचे आराध्य दैवत संत नरहरी महाराज यांचे नांवे भवन व विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल, तसेच एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी व अन्य स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र व गरजू विद्याथ्यार्ना शिष्यवृत्ती देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कोर्टी येथे संत नरहरी यांच्या माता पित्यांच्या समाधीचा पुर्नविकास तसेच पंढरपूर येथील मल्लिकार्जुन मंदिरामध्ये संत नरहरीचे मुर्ती स्थापना करण्यासाठी प्रतिष्ठांनमार्फत कार्यवाही सुरु आहे.

सदर ॲड. राजन दीक्षित यांच्या निवडीमुळे सदर प्रतिष्ठानला मोलाची मदत होणार असल्याचे अध्यक्ष सौ. अंजलीताई अनासणे व सुरेश अनासणे यांनी या प्रसंगी सांगितले. मुंबई येथील प्रभाकर मोरे तसेच माझे सहकार सह. आयुक्त संजीव खडके तसेच अनेक मित्र मंडळीनी ॲडव्होकेट राजन दीक्षित यांच निवडीबद्दल अभिनंदन केले.

# मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने रविवारपासून श्री शिवजन्मोत्सव व्याख्यानमाला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दि. 16 ते 18 फेब्रुवारी 2025 दरम्यान रोज सायंकाळी 6.30 वाजता शिवतीर्थ, छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर येथे छत्रपती शिवजन्मोत्सव व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर येथील शिवतीर्थ, छत्रपती शिवाजी प्रशाला येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्ठित मूर्तीची प्रतिष्ठापना रविवार दि. 16 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5 वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. श्री शिवजन्मोत्सव व्याख्यानमालेचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम राजकुमार, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते रविवार दि. 16 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6.30 वाजता होणार आहे. याच दिवशी व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प डॉ. केदारनाथ फाळके हे गुंफणार आहेत. "आज्ञापत्र व शिवछत्रपतींची राजनीती" हा त्यांचा व्याख्यानाचा विषय आहे. सोमवार दि. 17 फेब्रुवारी रोजी अमर हजारे (बीड) हे "मानवी मूल्य जागवल्याशिवाय समाज विकास अशक्य" या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत. याप्रसंगी शिव प्रतिमेचे पूजन पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या हस्ते होणार आहे. मंगळवारी 18 फेब्रुवारी रोजी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या हस्ते शिव प्रतिमेचे पूजन होणार आहे. त्यानंतर डॉ. चंद्रकांत चव्हाण हे "मराठ्यांचे स्वातंत्र्यलढ्याचे तेजस्वी पर्व - रणरागिणी ताराराणी" या विषयावर तिसरे पुष्प गुंफणार आहेत.

बुधवार दि. 19 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6.30 वाजता सोलापूर नगरपरिषद प्रशासन सहआयुक्त विणा पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर शिवजयंतीनिमित्त महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. शिवभक्तांनी शिवतीर्थ येथे महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस विनायक पाटील, प्रा. महेश माने , ज्ञानेश्वर सपाटे, नामदेव थोरात, महादेव गवळी, सुनिता साळुंके , अशोक चव्हाण , शिवदास चटके, सुजाता जुगदार , डॉ. मधुकर पवार, उदयसिंह पवार, किशोर बनसोडे, दत्ता भोसले आदी उपस्थित होते.

# शौचालय हटविण्यासाठी आज महिलांकडून सिद्धेश्वरांची महाआरती

## मनपा प्रशासनाला सद्बुद्धी देण्यासाठी घालणार साकडं



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरातील विष्णू घाट येथील व लक्ष्मी मार्केट समोर असलेल्या प्रवेशद्वाराशेजारी असलेले शौचालय हटविण्यात यावे यासाठी सोलापूर शहरातील तमाम महिला मंडळाच्या वतीने ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांना महाआरती करून प्रशासनाला शौचालय हटवण्याची सद्बुद्धी द्या असे साकडे घालण्यात येणार आहे. ही महाआरती आज शनिवार दि. 15, फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6 वाजता श्री सिद्धेश्वर मंदिर येथे होणार आहे.

या महाआरतीत जिजाऊ ब्रिगेड, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ महिला मंडळ, उद्योगवर्धिनी उद्योग समूह, जैन कासार महिला मंडळ, वडार समाज महिला मंडळ, पद्मशाली सखी संगम, पतंजली योग महिला समिती, शिवसेना महिला आघाडी (ठाकरे गट), महाराष्ट्र वीरशैव सभा महिला आघाडी, अक्कनबळग महिला मंडळ, बसव केंद्र, कलासंगम फाउंडेशन, दानेश्वरी महिला मंडळ, वीरशैव जंगम समाज महिला आघाडी, शिवदासमय महिला मंडळ, बसव योग केंद्र, मुग्धा फाउंडेशन, अक्कमहादेवी महिला मंडळ (मड्डी वस्ती), वीरशैव महिला मंडळ (सम्राट चौक), रुद्रसेना महिला मंडळ, स्वामी समर्थ महिला मंडळ, वीरशैव व्हिजन महिला आघाडी या महिला मंडळांचा समावेश आहे.

# आमदार नसतानाही गाडीवर लोगो लावून मिरवतात



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील विरोधक हे विकासाच्या मुद्द्यावर अजूनही भाष्य करत नाहीत. परंतु लोकनेते परिवारावर टीका करून चर्चेच्या झोतात राहण्याचा प्रयत्न करतात,हे त्यांचे दुर्दैव आहे. माझे वडील तीन वेळेस आमदार होते. परंतु कधी माज्या स्वतःच्या गाडीवर आमदारकीचा लोगो लावला नाही. मात्र काहीजण आमदार नसताना गाडीवर आमदारकीचा लोगो लावून मिरवत असल्याची टीका सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी केली.माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा जयंती उत्सव सोहळा व अजिंक्यराणा पाटील युवाशक्ती सामाजिक संघटना शाखा उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाचे उदघाटन पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्योत्स्ना पाटील,यशोदा कांबळे, वैभव गुंड, प्रमोद डोके, संस्थापक अध्यक्ष राहुल कसबे, शहराध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, बालाजी साठे, अमर चव्हाण, सोमनाथ धावणे, अशोक गायकवाड, दीपक चव्हाण, पंडित ढवण, मुस्ताफ शेख, पै. समाधान पाटील आदी उपस्थित होते.

## अर्थ विभाग जिल्हा परिषद सोलापूर

### जाहिर ई - निविदा

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागाचे अभिलेख जतन करणेसाठी कॉम्पॅक्टर खरेदी करणे करीता सन २०२४-२५ मध्ये अधिकृत कंपनी किंवा संस्थेकडून ई - निविदा व्दारे दर मागविण्यात येत असुन कॉम्पॅक्टर खरेदी ई - निविदा संबंधीच्या अटी व शर्थी इत्यादी बाबतचा तपशिल ई- टेंडर नोटिस मध्ये नमुद केलेला असुन http://mahatender.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पहावयास उपलब्ध आहे. तरी इच्छुक कंपनी अथवा संस्थेने यात सहभाग नोंदवावा.

**सही/-**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी (व)**
**जिल्हा परिषद सोलापूर**

# छावा चित्रपटाचे संभाजी ब्रिगेडच्या वतीने जल्लोषात स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बहुचर्चित छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रावरील छावा चित्रपट सोलापुरातील सर्व चित्रपटगृह येथे प्रदर्शित करण्यात आला.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी फर्स्ट शो फर्स्ट डे या चित्रपट पाहण्यासाठी गर्दी केली होती यावेळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या पोस्टरला पुष्पवृष्टी व फटाक्याची अतिशबाजी करून जल्लोष करण्यात आला यावेळी छत्रपती संभाजी महाराज की जय जय भवानी जय शिवाजी हर हर महादेव च्या घोषणेने परिसर दुमदुमला होता.

या चित्रपटांमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रमी इतिहास मांडण्यात आला होता रयतेच्या स्वराज्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले चित्रपटाला हे दृश्य पाहून अनेकांना गहिवरून आले होते तरी सोलापुरातील सर्वांनी सहकुटुंब हा चित्रपट पहावा असे आवाहन संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले.

## महाराष्ट्र शासन

### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक २९ सन २०२४-२५ (ऑनलाईन)**
**(दुबार निविदा सूचना)**

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि.२७/०९/२०१८

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापुर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालील कामा करिता "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. १४/०२/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि. २४/०२/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | ---निरंक--- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि. २४/०२/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | ई-नविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर ७२ तासात हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ | दि. २७/०२/२०२५ मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/- (मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(डीजीआयपीआर-२०२४-२५/क्र-५/सी६४०७)

# सोलापूर गारमेंट पार्कसाठी खा. प्रणिती शिंदेकडून पाठपुरावा



**नवी दिल्ली,(वृत्त सेवा):-** सोलापुरात गारमेंट पार्क स्थापन करण्याचा मुद्दा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या संदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्ली येथे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंग यांची भेट घेऊन पाठपुरावा केला आहे. सोलापुरात स्वतंत्र गारमेंट पार्क आणि सोलापूर चादरीच्या बनावटी करणाविरोधात कारवाई करण्याबाबतचे पत्र खासदार प्रणिती शिंदे यांनी सिंग यांना दिले आहे. सोलापूरच्या प्रश्नावर खासदार प्रणिती शिंदे नेहमीच सकारात्मक भूमिका घेताना दिसून येत आहेत. नुकतेच त्यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांची भेट घेऊन सोलापूर टेक्सटाईल पार्कच्या अनुषंगाने चर्चा केली. यावेळी दिलेल्या पत्रात त्यांनी सोलापूर हे एक देशातील महत्त्वाचे वस्त्र उत्पादन केंद्र आहे, विशेषतः टॉवेल, बेडशीट आणि गणवेश निर्मितीत सोलापूर अग्रेसर आहे. परंतू सोलापूरमधील या वस्त्र उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागतिक स्तरावर स्पर्धेत टिकण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सुविधांनी सुसज्ज अशा स्वतंत्र गारमेंट पार्कची आवश्यकता असल्याच्या गोष्टीकडे लक्ष वेधले.

सोलापुरातील या गारमेंट पार्कमुळे येथील वस्त्रोद्योग व्यावसायिकांना सर्व आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी मिळू शकतील. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास चालना मिळाल्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता वाढवता येईल.परिणामी निर्यात वाढवून सोलापूरच्या वस्त्र उद्योगाला जागतिक बाजारपेठेत अधिक चांगल्या पद्धतीने स्पर्धा करता येईल. या उपक्रमामुळे हजारो स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. त्यामुळे वस्त्रोद्योगाच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारने या गारमेंट पार्कच्या निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंती खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

### सोलापूर चादरीच्या बनावटी विरोधात कारवाई करा

याच बरोबर खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर चादर उत्पादनास मारक ठरणाऱ्या बनावट चादररीचा मुद्दा देखील मंत्री गिरिराज सिंग यांच्या पुढे मांडला. सोलापूर चादरीच्या अनधिकृत बनावटीकरणामुळे मूळ विणकरांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. सोलापूर चादर ही भौगोलिक निदेशांक (GI) प्रमाणपत्र प्राप्त असलेली उत्पादने असून, ती स्थानिक विणकरांच्या कौशल्याचे प्रतीक आहे. परंतु सद्या बाजारात बनावट चादरींच्या विक्रीमुळे अस्सल चादर उत्पादक विणकरांना आर्थिक फटका बसत असल्याच्या गोष्टीकडे खासदार शिंदे यांनी लक्ष वेधले. या प्रकरणी स्थानिक उद्योजक आणि विणकर संघटनांकडून या नकली उत्पादकांवर कठोर कायदेशीर पावले उचलण्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने जीआय कायद्याची कडक अंमलबजावणी करावी आणि बाजारात अधिक काटेकोरपणे निरीक्षण करावे. तसेच सोलापूरच्या अस्सल चादर निर्मितीच्या कलेचा सन्मान राखण्यासाठी नकली उत्पादनांच्या विक्रीवर कडक कारवाई करण्याची मागणी त्यांनी मंत्र्यांकडे केली आहे. यावर केंद्रीय मंत्री गिरिराज सिंग यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती खासदार प्रणिती शिंदे यांनी दिली.

# समांतर जलवाहिनी प्रकल्पातील सर्व सहा पंपांची चाचणी यशस्वी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पाणीपुरवठा शहराचा सुधारण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या पंपगृहातील सर्व सहा पंपांची चाचणी यशस्वी झाली आहे.महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही चाचणी घेण्यात आली. ती यशस्वी झाल्याची माहिती स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.उजनी धरणावर उभारलेल्या नवीन पंपगृहात ११५० अश्वशक्ती क्षमतेचे सहा पंप बसविण्याचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. चाचणीदरम्यान सर्व पंप यशस्वीरीत्या कार्यान्वित झाल्याचे स्पष्ट झाले.यावेळी स्मार्ट सिटी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम,जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील,मक्तेदार कंपनीचे प्रकल्प अधिकारी अरुण पाटील, स्मार्ट सिटीचे सहायक अभियंता उमर बागवान यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

उजनी समांतर जलवाहिनी प्रकल्पात एकूण पाइपलाइनचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित केवळ तीन किलोमीटरचे काम मार्चअखेर पूर्ण करण्याचे नियोजन मनपाने केले आहे. ११० किलोमीटरपैकी १०७ किलोमीटर या प्रकल्पामुळे शहराला १७० एमएलडी क्षमतेचा पाणीपुरवठा शक्य होणार आहे.उर्वरित तीन किलोमीटर पाइपलाइनसाठी जिल्हा प्रशासन, महापालिका, ग्रामीण पोलिस दल, आणि स्मार्ट सिटीचे अधिकारी समन्वय साधून काम करत आहेत. या प्रकल्पामुळे सोलापूरकरांना नियमित व मुबलक पाणी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.समांतर जलवाहिनीच्या बाह्यवळण १८०० रस्त्याजवळील मीटरपैकी ८०० मीटर पाइपलाइनचे काम पूर्ण झाले आहे. सद्य:स्थितीत ११० किलोमीटरपैकी १०७ किलोमीटर पाइपलाइन टाकण्याचे काम तसेच ८४ किलोमीटरची हायड्रॉलिक चाचणी पूर्ण झाली आहे, असे चौबे यांनी सांगितले.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## बार्शी नगरपरिषद, बार्शी

### जि.सोलापूर

दूरध्वनी : 02184-222205,222218 email: bnpbarshi@gmail.com
Web:- www.barshinagarparishad.org

जा.क्र.स्थापत्य/८८१/नगरपरिषद कार्यालय,बार्शी **स्थापत्य विभाग** दिनांक- १४/०२/२०२५

### अल्प मुदतीची जाहिर निविदा ७ (२०२४-२५)

१) बार्शी नगरपरिषद खालील नमुद कामाकरिता बंद लखोटयातून खालील निविदा मागवित आहे. निविदापत्रके दि. २०/२/२०२५ रोजी दु. ४-०० वाजेपर्यत स्थापत्य विभागाकडे विकत मिळतील दि. २१/२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके नागरी सुविधा केंद्र कार्यालयात स्विकारली जातील. बयाणा रकमेपोटीचे रकमेचा धनाकर्ष (डि. डि.) व्दारे स्विकारणेत येईल. रोख रक्कम भरणा करून घेतली जाणार नाही. धनाकर्ष सोबत असलेशिवाय निविदापत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दि. २९/२१२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता हजर निविदाधारकांसमोर अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) उघडणेत येतील. बंद लखोटयावर ज्या त्या कामाचे नाव लिहावे. निविदा २ पाकिट पध्दतीने स्विकारल्या जातील पाकिट क्र. १ बयाणा रकमेचा धनाकर्ष (डी.डी), आयकर पॅन नंबर, जीएसटी, ईपीएफ १ वर्षाचे आयटी प्रमाणपत्र तसेच ३ लक्षच्या आतील कामास परिशिष्ट-अ प्रमाणपत्र (र.रु.१०० चे स्टॅम्पवर), सत्य प्रतिज्ञालेख (र.रु. १०० चे स्टॅम्पवर) आणि ३ लक्षच्या वरील कामास परिशिष्ट-अ प्रमाणपत्र (र.रु.५०० चे स्टॅम्पवर), सत्य प्रतिज्ञालेख (र.रु.५०० चे स्टॅम्पवर), महाराष्ट्र शासनाचे सार्व. बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र रिनिव्हल असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्र. क्र. ८ /इमा-२ दि. २०/०५/२०२१ अन्वये १० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करुन) रकमेवरील कामे ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणेबाबतच्या सुचना देणेत आलेल्या आहे. तसेच पाकिट क्र.२ मध्ये भरलेली निविदा सादर करावी. निविदाच्या अटी शर्ती वगैरे संपूर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. कमी अथवा जादा दराची निविदा मंजुर करणे अथवा नामंजुर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. सदरचे काम तात्काळ करणे गरजेचे असलेने अल्प मुदतीची जाहीर निविदा करणेत येत आहे.

**तपशील**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजे वार्षीक र.रु. | बयाणा रक्कम रु. | निविदा किंमत | सुरक्षित ठेव | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बार्शी शहर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर शिवसृष्टी येथे सुशोभिकरण करणे. (मुख्य कमानीचे काम) | ८,२३,९४१/- | ८५००/- | २३६/- | बिलातून ४% | १ महिना |
| २ | बार्शी शहर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर शिवसृष्टी येथे सुशोभिकरण करणे. | ६,५१,०४०/- | ६६००/- | २३६/- | बिलातून ४% | १ महिना |

टिप:- नमूद वरील कामे ही न. पा. निधीमधुन प्रस्तावीत केली असुन जसजसी वित्तीय तरतुद उपलब्ध होतील तसतसी बिले अदा केली जातील याची नोंद घ्यावी.

**नगरपरिषद कार्यालय,**
**बार्शी दि. १४/२/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी**

# जिल्ह्यात आजपर्यंत जीबीएसचे अकरा रुग्ण आढळले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जीबीएस आजाराचे आजपर्यंत सोलापूर शहर -जिल्ह्यात अकरा रुग्ण आढळून आले आहेत.त्यातील नऊ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. तर उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला. जीबीएस आजाराबाबत आरोग्य विभागाकडून सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. हा आजार नियंत्रणात जिल्ह्यात उपचार सुरू असणाऱ्या रुग्णांची संख्या पंढरपूर - २, अक्कलकोट - १, माढा - १, बार्शी - १, दक्षिण सोलापूर - १, धाराशिव - १, पुणे- १, कर्नाटक - १ उपचारादरम्यान सोलापूर शहरातील मृत्यू पावलेल्या रुग्णांची संख्या - २ आहे.नागरिकांनी पाणी उकळून प्यावे, शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी केले आहे.घेतला जात आहे. यासाठी सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे.



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार जलस्रोतांची रासायनिक व आशाताईच्या माध्यमातून जीबीएस आजाराच्या रुग्णांचा शोध जैविक तपासणी करण्यात येत आहे. हा आजार सोलापूर-शहर जिल्ह्यात पूर्णतः नियंत्रणात असून, उपचारादरम्यान पुणे व सोलापूर येथील दोन रुग्णांचा सोलापूर शहरातील रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला आहे. या आजारावर खर्च महागडा असल्याने महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून या आजाराने बाधित झालेल्या रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येत असल्याचे डॉ. नवले यांनी सांगितले.

# पंढरीत कै. आ. भालके यांची जयंती; 'मनसे'च्या वतीने वृद्धाश्रमात अन्नदान

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** लोकनेते कै. आ. भारत भालके हे प्रत्येक गोरगरीब, वंचित, पिडीत घटकाला आपले वाटायचे. अशा घटकांसाठी कै. आ. भालके यांनी केलेले कार्य मोलाचे असून कोणीही ते विसरू शकणार नाही. या कायार्चा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कै. आ. भालके यांचा पाईक म्हणून यापुढील काळात आपण प्रत्येक समाज घटकासाठी झोकून देऊन काम करत राहणार असल्याचे प्रतिपादन 'मनसे'चे सरचिटणीस दिलीप धोत्रे यांनी केले.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने लोकनेते कै. आ.भारत भालके यांची ६५ वी जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. याअंतर्गत गोपाळपूर येथील मातोश्री



वृद्धाश्रमातील वृद्धांना मिष्टान भोजन देण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलताना धोत्रे म्हणाले, माणसांत मिळून मिसळून, प्रत्येकासाठी काम करण्यातून कै. आ. भालके यांना ऊर्जा मिळायची. कामच कामाचा गुरू मानून त्यांची अखेरपर्यंत वाटचाल राहिली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करण्याचा आपला मानस आहे.कै. आ. भालके यांचे स्वप्न साकार करण्यासाठी यापुढील काळात प्रत्येक घटकाचे प्रश्न सोडवण्याचे काम केले जाईल. जनतेसाठी आपले कार्यालय सदैव खुले राहील, असा संकल्पही धोत्रे यांनी जयंतीनिमित्त जामदार जाहीर केला. के प्रारंभी कै. आ.भारत भालके यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. वयोवृध्दांना स्वतः मिष्टान्न भोजन देत धोत्रे यांनी सर्वांशी संवाद साधला. यावेळी अरुण कोळी, ॲड. संदीप रणनवरे, गणेश पिंपळनेरकर, दत्ता वलेकर, आदिनाथ भोसले, प्रदीप परचडे, सुरज देवकर, आकाश बंदपट्टे, ओंकार पिसे,अनिल सप्ताळ आदी उपस्थित होते.

# शिवरत्न पॅटर्नच्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत घवघवीत यश




अकलूज (कटूसत्य वृत्त):- देशपातळीवर घेण्यात आलेली JEE EXAM FIRST SESSION 2025 परीक्षेत शंकरनगर - अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्थेच्या शिवरत्न पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांपैकी शिवरत्न पॅटर्न, अकलूज चे खालील विद्यार्थी हे देशातील नामवंत अशा प्रतिष्ठित IIT / NIT INSTITUTE मध्ये प्रवेश मिळण्यास पात्र झालेले आहेत.

1) कु. स्वयम पंकज किटुकाले 97.21%

2) कुमारी. क्षितिजा पुष्कराज गांधी 87.92 %

3) कु. आर्यन सुजय गोडसे 82.60 %

4) कुमारी. तनवी नितीन राणे 81.74 %

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी लातूर पॅटर्नवर आधारित शिवरत्न पॅटर्न, अकलूजची सुरूवात करण्यात आली होती. या शिवरत्न पॅटर्नच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थी घवघवीत यश संपादन करत आहेत ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे..

या वेळी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील व अध्यक्ष शितलदेवी मोहिते पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचे अभिनंदन केले. या वेळी शिवरत्न शिक्षण संस्थेचे संचालक, व्यवस्थापन समिती सदस्य, प्राचार्य, समन्वयक, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचे अभिनंदन केले.

# रंगभरण स्पर्धेचे आज बक्षिस वितरण

## साने गुरुजी पतसंस्थेचा उपक्रम

**सोलापुर (कटूसत्य वृत्त):-** साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या रंगभरण स्पधेर्चे बक्षिस वितरण आज होणार असल्याची माहीती पतसंस्थेचे संचालक सुनिल चव्हाण यांनी दिली.

साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेच्या रौप्यमहौत्सवी वर्षाचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांसाठी रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पंधरा हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. एकुण तीन गटात ही स्पर्धा पार पडली. प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, गुलाबपुष्प व रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे. शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमास दिलीप पतंगे, शंकर चौगुले, माऊली झांबरे, राजेंद्र कुलकर्णी, आप्पासाहेब पाटील, सोमेश्वर याबाजी, अनिल



गायकवाड, अ. गफुर अरब व अनिल गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम शनिवारी सायंकाळी ६ वाजता स्नेहपुष्प लॉन, अंत्रोळीकर नगर येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमास सभासदांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चेअरमन भिमराया कापसे, सचिव आप्पाराव इटेकर, भाऊसाहेब मोरे, विरभद्र यादवाड, विनोद आगलावे, सुनिल चव्हाण, सचिन चौधरी, मुरलीधर कडलासकर, जयंत गायकवाड, धनाजी मोरे, उल्हास बिराजदार, शिवानंद हिरेमठ, महादेवी पाटील व फरजाना रचभरे यांनी केले.

# प्रियांका पाटील एमपीएससी मधून अन्न सुरक्षा अधिकारी

## मुलगी अधिकारी झालेली पाहण्याचे वडिलांचे स्वप्न अधुरे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** लहानपणीच आईचे छत्र हरपले,वडिलांनी आईचे दुःख जाणवू न देता सांभाळ केला.मुलीला उच्च शिक्षण घेऊन अधिकारी होण्याचे स्वप्न दाखवले.मुलीने वडिलांचे स्वप्न जिद्दीने अभ्यास करून पूर्ण करीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत अन्न सुरक्षा अधिकारी वर्ग-२ या पदाला गवसणी घातली.

मात्र निकालाच्या अवघ्या चार दिवसांपूर्वी वडिलांनी या जगाचा अखेरचा निरोप घेतला. ही मन अतिशय सुन्न करणारी



कहाणी आहे माढा तालुक्यातील अकोले-खुर्द ची कन्या प्रियांका प्रताप पाटील हिची.

अकोले-खुर्द येथील प्रताप शामराव पाटील यांचे नुकतेच निधन झाले.ते दोन मुली व एक मुलगा असे एकमेकांना आधार देत दिवस कंठीत होते.मुलांची आई तर लहानपणीच गेली होती.यामुळे आई-वडिलांचे छत्र हरपल्याने प्रियांकासह दोन्ही बहिणी व भाऊ अशी तिन्ही भावंड आई-वडिलांच्या आशीवार्दास कायमची पोरकी झाली.अशात एकीकडे वडिलांचे दुःख तर दुसरीकडे निवड झाल्याच्या आनंदाचा क्षण अशी स्थिती माढा तालुक्यातील अकोले खुर्द येथील पाटील कुटुंबात पाहायला मिळाली आहे.प्रियांकाला अधिकारी म्हणून पाहण्याचे वडील प्रताप पाटील यांचे स्वप्न होते.अखेर ते स्वप्नच राहिले.

# करजगी येथील बलात्कारी आरोपीवर कारवाई करण्यासाठी मोहोळ मध्ये जन आक्रोश मोर्चा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जत तालुक्यातील करजगी गाव मध्ये एका ४५ वर्षीय पांडुरंग कल्ली या इसमाने चार वर्षीय अल्पवयीन मुलीवर अमानुषपणे बलात्कार करून त्याची निर्गुण हत्या करण्यात आली. या इसमावर कायदेशीर कारवाई करून हे प्रकरण जलद गती न्यायालयात दाखल करून या इसमास फाशीची शिक्षा व्हावी यासाठी मोहोळ तालुका व शहर मुस्लिम समाजाच्या वतीने आक्रोश मोर्चा शुक्रवार दिनांक 13 फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता महबूब सुभानी दर्गा येथून निघून हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मोहोळ तहसील कार्यालयाकडे आला या ठिकाणी मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने कारवाई करण्याचे निवेदन नायब तहसीलदार सुधाकर धांईजे यांना देण्यात आले.




या निवेदनानंतर जर शासनाने त्या आरोपीवर कारवाई नाही केली तर मोहोळ तालुका मुस्लिम समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी मनोगततून समाज बांधवांनी दिला.

या जन आक्रोश मोर्चामध्ये मोहोळ शहर व तालुक्यातील मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. या जन आक्रोश मोर्चामध्ये भाजपच्या वतीने भाजप शहराध्यक्ष सुशील क्षीरसागर आरपीआय पक्षाच्या वतीने हनुमंत कसबे तर शिवसेना उबाठा च्या वतीने शिवरत्न गायकवाड यांनी पाठिंबा दिला

# चौधरी फाउंडेशन, मावळा प्रतिष्ठानतर्फे उद्या विद्यार्थ्यांसाठी छावाचा मोफत शो

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चौधरी फाउंडेशन, सोलापूर आणि मावळा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रविवार दि.16 फेब्रुवारी रोजी सकाळी 9 वाजता छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असलेला छावा हा चित्रपट विद्यार्थ्यांना मोफत दाखविण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. विद्यार्थ्यांना इतिहासाची माहिती व्हावी.

त्या प्रेरक इतिहासातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी पुढील वाटचाल करावी. या उद्देशातून हा चित्रपट दाखविण्याचे नियोजन केले आहे.

भागवत डलॅब चित्रपटगृहात 250 विद्यार्थ्यांना हा चित्रपट मोफत दाखविण्यात येणार आहे. 11 ते 15 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांनी या चित्रपटाचा लाभ घ्यावा अधिक माहितीसाठी विराज इंगळे 96 99 40 62 15 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कपिल अलाट यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस विराज इंगळे, अमित भोसले आदी उपस्थित होते.

# भाडेवाढीमुळे एसटीच्या उत्पन्नात वाढ

## प्रवाशांच्या सुविधांचे काय ?

## लग्नसराईमुळे एसटीला वाढतेय गर्दी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने २५ जानेवारीपासून १५ टक्के भाडेवाढ केल्याने एसटीचा प्रवास महागला आहे. आर्थिक भार सोसत प्रवाशांची एसटीतून प्रवास करण्याला पसंती तर लग्नसराईमुळेही एसटीला चांगलीच गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे सोलापूर एसटी

विभागाच्या उत्पन्नात १० ते १५ टक्के वाढ झाली आहे.मात्र एसटीच्या फेऱ्या कधी वाढणार, बसमध्ये प्रवाशांना कधी चांगल्या सुविधा मिळणार, अशी आशा प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.एसटी महामंडळाने इंधनाची दरवाढ, होणारा तोटा लक्षात घेत तीन वर्षानंतर तिकीट दरात भाडेवाढ लागू गेली.



या दरवाढीबाबत प्रवाशांसह अनेकांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. सोलापूर एसटी विभागाचे भाडेवाढ पूर्वीचे दररोजचे सुमारे ७० लाख रुपये उत्पन्न होते. आता भाडेवाढ नंतर यामध्ये वाढ होत असल्याची माहिती समोर येत आहे. जळगाव एसटी विभागात ६८० वाहनांची संख्या असून नवीन अद्याप गाड्या नाही, आहे त्या गाड्यांमध्ये फेऱ्यांचे नियोजन करताना अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. गाड्यांची संख्या सोलापूर विभागातील प्रवाशांच्या संख्येच्या मानाने कमी असल्याने अजून १०० गाड्यांची आवश्यकता आहे. सुविधांचा, स्वच्छतेचाही प्रश्न एसटी बसमधील तुटलेले आसन, खिडक्या, एसटीमधील अस्वच्छतेमध्ये प्रवाशांना प्रवास करावा लागतो. भाडे वाढवल्याप्रमाणे चांगल्या सुविधादेखील एसटीने द्याव्यात, अशी इच्छा प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सवास शुभारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या महोत्सवाचे उद्घाटन युवानेते सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.हा महोत्सव १४ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी विविध स्पधेर्चे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना सयाजीराजे मोहिते-पाटील म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थीना अभ्यासाबरोबर खेळाचे देखीला ही महत्व दिले असल्यामुळे यातून उदयमुख खेळाडू निर्माण होतील. सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या विकासाचा चौफेर आढावा घेतला.

या सृजनरंग महोत्सवामध्ये महाविद्यालयातील आर्ट्स, कॉमर्स, सायन्स वगार्तील विद्यार्थी मोठ्या



संख्येने सहभागी झाले आहेत. आज सुरुवातीच्या दिवशी बॉक्स विकेट क्रिकेटच्या मॅचेस घेण्यात आल्या. या स्पर्धेचे समालोचन व्यावसाय अभ्यासक्रमाचे प्रा. जयंत माने यांनी केले. यानंतर या महोत्सवामध्ये मोबाईल फोटोग्राफी, मेहंदी स्पर्धा, निबंध स्पर्धा, लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धामधून विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह असल्याचे दिसून येत आहे.या स्पर्धेमध्ये प्रत्येक संघासाठी महाविद्यालयातील शिक्षक संघ व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले असून या प्रत्येक स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी महाविद्यालय बाहेरील परीक्षक नेमण्यात आले आहेत. या स्पर्धा पाहण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होत आहे.

या स्पर्धा पार पडण्यासाठी सृजनरंग महोत्सवाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड तसेच सर्व स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेत आहेत.

# नातेपुते एज्युकेशन सोसायटी प्राथमिक विभागांमध्ये मातृ-पितृ पूजन सोहळा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक विभागामध्ये आज १४ फेब्रुवारी २०२५ रोजी हा दिवस मातृ-पितृ पूजन सोहळा म्हणून साजरी करण्यात आला.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन धैर्यशील देशमुख तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रभारी जनरल सेक्रेटरी अरविंद पाठक प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कुंडलिक इंगळे उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन धैरशील देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून बोलत असताना सांगितले की




,घरातील संस्कार अतिशय महत्त्वाचे आहेत जिजाऊंनी शिवाजीराजावर संस्कार केले त्यामुळे शिवाजीराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. थोर महापुरुष संत यांच्यावर ज्या पद्धतीने घरातून संस्कार झाले त्यातूनच त्यांची थोरवी जगापुढे आली असल्याचे मत देशमुख यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना समोर उभा करून त्यांचे पाय पूजन करून औक्षण केले तसेच आई-वडिलांच्या पायावर मस्त ठेवून आशीर्वाद घेतला. प्रमुख पाहुणे अरविंद पाठक, पालक व विद्यार्थी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. प्राथमिक विभागातर्फे विद्यार्थी व पालक यांना खाऊ वाटप करण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राथमिक विभागाचेप्राथमिक विभागाचे रविन्द्र ननवरे तसेच शिक्षक अभिजीत वाळ्के, संजय जाधव,मनोज पवार किशोर भरते, मारुती भांगरे, सुनील कदम अक्षय इंगोले, सागर बरडकर, सुरेखा कुंभार, वर्षा बडवे, कांचन नाळे, बिना मुलाणी, प्रियांका भरते, मीनाक्षी पानसकर, चंद्रभागा खर्चे,पल्लवी ठोंबरे, विनायक चांगण, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत वाळ्के यांनी केले तर आभार संजय जाधव यांनी मानले कार्यक्रमासाठी विद्यार्थी पालक माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकलूजच्या कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम वषार्तील विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये प्रथम वर्ष बी. फार्मसी व थेट द्वितीय वर्ष बी. फार्मसी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सभापती विनोद कुमार दोशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक नारायण फुले, रामभाऊ गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य श्री नानासाहेब देवडकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल भानवसे यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष बी.फार्मसी व द्वितीय वर्ष बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे यांनी मनोगत व्यक्त करताना नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने स्वागत केले.यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने राबवत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच्या धोरणांची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली.

या स्वागत समारंभाचे आयोजन महाविद्यालयातील द्वितीय तृतीय व अंतिम वर्ष वगार्तील विद्यार्थ्यांनी केले होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अंतिम वर्ष वगार्तील विद्यार्थी श्रीप्रसाद कुलकर्णी व कु.प्रियांका कुलकर्णी यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# राजराजेश्वरी प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवणसिद्ध रोडगीकर, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, नेताजी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, प्रशालेचे मुख्याध्यापक



ज्ञानेश्वर म्हेत्रे आदी उपस्थित होते.

प्रथम वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिमरन चन्ना या विद्यार्थिनीने केले. यावेळी भालचंद्र वाघमारे, समर्थ जेऊरे, सिद्धार्थ कांबळे, सुमित जुटला, नंदिनी वालीकर, वाणीश्री वंगारी,जयश्री भोरगुंडे, आरती आवार, श्रेया वच्चे,आणि रजिता यनगंटी या विद्यार्थ्यांनी मनोगतातून शाळा आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केले.शिक्षक प्रतिनिधी विश्वनाथ तंबाके यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांच्या दहा वर्षातील प्रगती व विविध उपक्रमातील सहभागामुळे शाळेचे नाव लौकीक झाल्याचे सांगितले.प्रमुख अतिथी रोडगीकर म्हणाले, सध्या स्पर्धेचे युग आहे. विद्यार्थ्यांनी परिश्रम, जिद्द व चिकाटीने पुढील आव्हाने स्वीकारावे. ज्ञानाशिवाय पर्याय नाही. उच्चशिक्षित व्हाल तरच टिकाल असे ते म्हणाले.

संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार, विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे परीक्षेला सामोरे जावे. परीक्षा अतिशय महत्त्वाचे असते. दहावी परीक्षा ही तुमच्या आयुष्यातील पहिली पायरी आहे. यशस्वीपणे पायरी पूर्ण करुन शाळेचे व आई-वडिलांचे नाव लौकीक करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केदार कुंभार यांनी केले तर सुमन बिराजदार यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.